Subject Name — Political Science

Paper Name — Indian Administration (Paper 2)

Class — M.A. Sem IV

Name of the Teacher — Sunanda A. Raut

Title — 73 व 74 वी घटनादुरुस्ती जिल्हाधिकारी

## 73 व 74 वी घटनादुरुस्ती

1989 साली गांधींच्या पुढाकारातून 64 व्या घटनादुरुस्ती विधेयकाच्या निमित्ताने स्थानिक स्वशासन अधिक मोकळे करण्याचा विचार लोकसभेत आला. पुढे अनेक अडथळ्यांच्या शर्ती पार करीत 1992 साली 73 व 74 वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत संमत झाले. या विधेयकाद्वारे भारतीय संविधानातील नवव्या भागात कलम 243 अंतर्भूत करण्यात आले. त्याप्रमाणे संविधानात अकरावे आणि बारावे परिशिष्ट अंतर्भूत करून त्यात नमूद राज्यसरकारकडून पंचायत राज व नागरी स्वशासन संस्थांकडे हस्तांतरित करावयाच्या अनुक्रमे 29 व 18 विषयांचा उल्लेख करण्यात आला.

ह्या घटनादुरुस्तीमधील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे होत्या.

1) पंचायत राज संस्थांना विशेषतः ग्रामसभेला घटनात्मक दर्जा देण्यात आला. त्रिस्तरीय व्यवस्था विकसित करण्यात आली.

2) स्थानिक स्वशासन संस्थांचा कार्यकाल पाच वर्षे करण्यात आला. निवडणुका बंधनकारक करण्यात येऊन निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोग स्थापण्याची तरतूद केली गेली.

3) स्थानिक शासनाच्या आर्थिक स्थितीचे अवलोकन करून त्यांना द्यावयाच्या निधीबाबत शिफारस करण्यासाठी राज्य वित्त आयोगाचे गठन करण्याचे निश्चित करण्यात आले.

4) वंचित, शोषित व दुर्बल घटक मुख्य प्रवाहात येण्याच्या दृष्टीने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आणि महिलांसाठी 1/3 किमान ~~स~~ जागा राखीव ठेवण्यात आल्या.

5) जिल्हा नियोजन समितीची स्थापना करण्यात आली.

या घटनादुरुस्तीमधील तरतुदींची तंतोतंत आणि सकारात्मक दृष्टिकोनातून अंमलबजावणी झाली असती तर या संविधान संशोधनाचा उद्देश सफल झाला असता. मुळात स्थानिक स्वशासनाच्या विकास व सक्षमीकरणात राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि प्रशासकीय अहंवाद हे दोन मुख्य व महत्त्वाचे प्रश्न आहेत.

## स्थानिक प्रशासन

## जिल्हा प्रशासन

राज्याचे प्रादेशिक संघराज्यात रूपांतर होत असताना स्वाभाविकपणे क्षेत्रीय प्रशासनाची गरज भासू लागते. राज्याचा एकजिनसीपणा, दळणवळणाची साधने, आर्थिक व्यवहाराचा व्याप यानुसार

कमीअधिक स्वायत्त व केंद्रीत असे जिल्हा प्रशासन त्यामधून निर्माण होते. ब्रिटिशपूर्व भारतातील इतिहासातही प्रशासकीय सोयीसाठी जिल्हा प्रशासन अस्तित्वात असल्याचे दिसून येते. केंद्रीय पातळीवरील प्रशासनाचे सर्व महत्त्वाचे कार्ये आणि रचना जिल्हा पातळीवर संघटित झालेली असतात.

जिल्हाधिकारी

जिल्हा प्रशासनाचा प्रमुख अधिकारी हा जिल्हाधिकारी (Distric collectore) हा भारतीय प्रशासकीय सेवेतील (Indian Administrative Services) सर्वोच्च अधिकारी असून जिल्हा प्रशासनाच्या बाबतीत तो कायदेशीरपणाला जबाबदार असतो. काही राज्यात त्याला डेप्युटी कमिशनर (Deputy Commissioner) तर काही राज्यात त्याला जिल्हा दंडाधिकारी (District Magistrate) म्हणून संबोधले जाते.

ब्रिटिश राज्यपद्धती आणि प्रांतिक स्वायत्ततेच्या काळात त्याच्या अधिकारक्षेत्रात वाढ झालेली दिसून येते. ग्रामीण विकास, समाजकल्याण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीची देखरेख आणि नियंत्रण प्रस्थापित झाले. पोलीस खात्यावरील त्याच्या नियंत्रणाविषयी मतभेद असले तरी कायदा आणि सुव्यवस्था हे आजही त्याचे महत्त्वाचे कार्यक्षेत्र ~~मात्र~~ मान्य करण्यात आले आहे. जीवनावश्यक वस्तू पुरवठा, स्वस्त धान्य वितरण व्यवस्था, नैसर्गिक आपत्ती व आणीबाणीच्या प्रसंगी नियंत्रण, नागरी व ग्रामीण स्थानिक प्रशासनावर नियंत्रण, निवडणुका आणि अनेक केंद्रीय व राज्य लोकसेवा प्रशासनावर नियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांचे असते. त्यामुळे तो राज्याचा जिल्हापातळीवरील प्रतिनिधी म्हणून आणि जिल्हापातळीवरील शासनाचे मुख्य स्वरूपच असतो.

He is not the agent of government at the district level he is the government at the district level.

## जिल्हाधिकाऱ्याची कार्ये

ब्रिटिश प्रशासनाच्या काळात निर्माण झालेल्या जिल्हाधिकाऱ्याकडे पारंपरिक महसुली प्रशासनाबरोबर विकास प्रशासनाची कार्येही सोपविलेली आहेत. शासनाच्या विविध खात्यांच्या कामकाजाचे मार्गदर्शन, संचालन, निरीक्षण व समन्वयक म्हणून भूमिका पार पाडत असतो. त्याच्या कामाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल

1) महसूल प्रशासक (Collector)

महसूल प्रशासनाशी संबंधित असलेली विविध कार्ये जिल्हाधिकारी या नात्याने तो पार पाडीत असतो. महसूल प्रशासनाचा तो जिल्हापातळीवरील प्रमुख अधिकारी असतो. जमीन महसूल ठरविणे वा गोळा करणे त्याची नोंद करणे, त्याचबरोबर जमीनमालकीची व त्यातील बदलांची नोंद तो अद्ययावत ठेवतो. शेतीसंबंधीचे कर गोळा करणे शेतीसंबंधीच्या कायद्यांची अंमलबजावणी करणे शेतीसंबंधीचे नुकसान व कर्जाचे वाटप करणे शासकीय कामासाठी भू-संपादन करणे आपत्कालीन योजनांची अंमलबजावणी करणे, पुरवठा व पुनर्वसन यासारख्या जबाबदाऱ्या पार पाडणे, पिकांची आणेवारी करणे.

2) जिल्हा दंडाधिकारी (District Magistrate)

सार्वजनिक शांतता, कायदा सुव्यवस्था राखणे हे जिल्हाधिकाऱ्याचे कार्य आहे. महसुली दाव्यासंबंधी तो न्यायदान करतो. तसेच फौजदारी कायद्यांच्या

त्याला अधिकार नाहीत. न्यायव्यवस्था आणि
कार्यकारी प्रशासन यांच्या कार्यांची हारनेने
फारकत केलेली आहे. पूर्वी कार्यकारी कार्याचा
अनुभव जिल्हाधिकाऱ्याला न्यायदान करताना
उपयोगी पडत असे. आता न्यायव्यवस्था आणि
कार्यकारी मंडळ यामधील फारकतीमुळे न्यायदानाचे
स्वरूप 'कायदेशीर न्याय' असे बनलेले आहे.
तथापि, कार्यकारी मंडळाच्या अधिकारावर आक्रमण
करण्याची प्रवृत्ती वाढत होता त्यांनी न्यायदानही
करणे हे न्यायतत्वाशी विसंगत होते. तथापि,
कार्यकारी मंडळाचे अधिकारावर आक्रमण करण्या
ची प्रवृत्ती वाढत होता त्यांनी न्यायदानही करणे
हे न्यायतत्वाशी विसंगत ~~अ~~ होते शांतता व
सुव्यवस्था राखण्याच्या कामी जिल्हा पोलीस
अधिकाऱ्याच्या यंत्रणेची त्याला मदत होते. जिल्हा
धिकाऱ्याच्या पोलीस यंत्रणेवरील अधिकाराबाबत
पोलीस यंत्रणेमध्ये नाराजी आहे.
जिल्हाधिकाऱ्याचे कार्य, मुख्य प्रतिबंधात्मक असते
पोलीस खात्याने पुरविलेल्या माहितीच्या आधारे
दंगल, अशांतता या काळात समाजविघातक शक्तींचा
तो बंदोबस्त करतो. तुरुंग-प्रशासन पोलीस
ठाणे यांचे निरीक्षण, नागरी ~~अ~~ दक्षता समित्यांचे
कार्य.

3) <u>जिल्हा प्रशासकीय अधिकारी</u> (District officer)

जिल्हा प्रशासनातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती, बदली
आस्थापना यावर निरीक्षण आणि नियंत्रण, त्यांच्या
निवृत्तिवेतनाबाबत निर्णय, कोषागाराची जबाबदारी,
स्थानिक स्वराज्य संस्थांवर देखरेख विविध
स्थानीय समित्यांचे गठन, वार्षिक अंदाजपत्रक
बनविणे, शासकीय इमारतींची देखभाल व्यवस्था आणि
आर्थिक तरतूद, जिल्ह्याचा प्रशासकीय अहवाल,
सरकारी विश्रामगृहांची व्यवस्था आणि

लोकनियुक्त मंत्री व महत्त्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्याच्या व्यवस्था, शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि कार्य यांचे व्यवस्थापन, शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था, स्वयं सेवकाची अंमलबजावणी, शासकीय उद्देशांना प्रवृत्त, विविध स्थानांच्या जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांच्या कामांचा समन्वय, जनतक्रारींचे निवारण इत्यादी कार्ये जिल्ह्याचा प्रशासकीय अधिकारी या नात्याने तो पार पाडीत असतो.

4) <u>शासनाचा जिल्हा प्रतिनिधी</u>
(Agent of the Government at District level)

लोकसभा आणि विधानसभा यांच्या निवडणुकांच्या वेळी जिल्हाधिकारी निवडणूक अधिकारी असतो. जिल्ह्याचा तो जनगणना अधिकारी असतो. जिल्हा गॅझेट तयार करणे, ऐतिहासिक ठिकाणे स्मारके यावर देखरेख ठेवणे, राष्ट्रीय बचत योजना, सैनिक कल्याण निधी, नाविक कल्याण निधी, यांची व्यवस्था, 15 ऑगस्ट व 26 जानेवारी अशा राष्ट्रीय कार्यक्रमाची आखणी, कर्मचारी कल्याण, कुटुंब कल्याण, साक्षरता, इत्यादी कार्यक्रमांमधील इष्टांक गाठण्यासाठी सहकार्य, लोकप्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांसंबंधी संबंधित, स्थानिक जिल्ह्याची माहिती व आकडेवारी काढणे इत्यादी कार्ये जिल्हाधिकारी करीत असतो. जिल्हाधिकाऱ्यांच्या कामाचे स्वरूप आणि त्याचे व्यापक कार्यक्षेत्र लक्षात घेता जिल्हा प्रशासनाचा तो आजही केंद्रबिंदू मानला जातो.

# जिल्हाधिकारी पदाचे महत्व

स्वातंत्र्यानंतर या पदाचे महत्व पूर्वीइतके राहिलेले नाही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकनियुक्त मंत्री आणि लोकप्रतिनिधींचे महत्व स्वाभाविकपणे वाढले. जनसंपर्क साधण्यासाठी मंत्र्यांना पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांची मदत घ्यावी लागे. आता राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांवर मंत्री संपर्कासाठी अवलंबून राहू लागले. त्यामुळे शासन आणि जनता यांमधील एकमेव दुवा हे जिल्हाधिकाऱ्याचे वैशिष्ट्ये हळूहळू अस्त जात आहे. त्याचबरोबर जनतेच्या मनस्थितीची माहिती देण्याचे, संरक्षणाचे जिल्हाधिकाऱ्याचे कामही महत्वपूर्ण राहिले नाही. जनतेच्या दृष्टीने जिल्हाधिकारी हा आता प्रतिशासन मायबाप स्वरूपात राहिला नाही.

शुद्ध जिल्हाधिकाऱ्याच्या कालखंडाचा व कार्याचा विचार करता नागरी सेवकाच्या जिल्हापदाचे महत्व कमी झालेले दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात सेवा कालखंडामधील जवळजवळ आठ वर्ष (१२ ते १८) जिल्हापातळीवरील कार्यपदात नागरी सेवक घालवीत असे. त्यामुळे जिल्हा प्रशासन सेवेत नियुक्त झाल्यानंतर तो चौथ्या-पाचव्या वर्षी जिल्हाधिकारी पदावर नियुक्त होतो आणि संपूर्ण सेवाकालखंडात साधारणतः चार-सहा वर्ष तो या पदावर काढतो. सततच्या बदल्यांमुळे त्याला आवश्यक तो अनुभवही मिळू शकत नाही. राजकारणी नेत्यांनाही थेट नेमणूकीने आलेल्या जिल्हाधिकाऱ्यापेक्षा पदोन्नतीने त्या जागेवर आलेला जिल्हाधिकारी कामकाजाच्या दृष्टीने सोयीचा वाटतो.

## संदर्भ सूची


1) लोकप्रशासन – के सागर व डॉ. व्ही. जी. नांदेडकर
2) समग्र लोकप्रशासन – प्रा. व्ही. बी. पाटील – के सागर पब्लिकेशन्स
3) भारतीय शासन व राजकारण – प्रा. डॉ. स्मिता जोशी (साबदेकर) पायल प्रकाशन नागपूर